महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे
कलम ३७(२) ची अधिसुचना निर्गमित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
शासन निर्णय क्र.टिपीएस-१२१८/१०४१/ प्र.क्र.७३/१८/नवि-१२
शिबीर कार्यालय, नागपूर.
दिनांक : - ५ जुलै, २०१८.

**<u>शासन निर्णय :-</u>** सोबतची शासकीय अधिसुचना (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ashok Kashirao Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2018.07.07 15:46:53 +05'30'

**(अशोक का. खांडेकर)**
**कार्यासन अधिकारी**

प्रति,

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
४) उपसचिव तथा उपसंचालक, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर.
६) सहायक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, ठाणे.
७) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

(त्यांना विनंती की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राच्या भाग-१ कोकण विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या प्रत्येकी ५ प्रती या विभागास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई , आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर व सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा यांना पाठवाव्यात.)

८) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२/- त्यांना विनंती की, सदरहू अधिसुचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

९) निवडनस्ती (कार्यासन नवि-१२)

**<u>महाराष्ट्र शासन</u>**
**नगर विकास विभाग**
**शिबीर कार्यालय, नागपूर.**
**दिनांक :- ५ जुलै, २०१८.**

**<u>अधिसुचना</u>**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६,**
**क्रमांक-टिपीएस-१२१८/१०४१/प्र.क्र.७३/१८/नवि-१२,**

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर शहराची सुधारीत विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१ (१) अन्वये शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्रमांक टिपीएस-१२९६/८४७/प्र.क्र.१६२/९६/नवि-१२, दिनांक १४ मे, १९९७ अन्वये मंजूर झाली असून, ती दिनांक १५ जुलै, १९९७ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-१२९८/९४१/प्र.क्र.८९/९८/नवि-१२, दि.२५/८/२००० अन्वये मंजूर झाली असुन, ती दि.१५/१०/२००० पासून अंमलात आली आहे (यापुढे ज्याचा एकत्रितपणे उल्लेख "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, भाईंदर (प.) येथील प्रभाग कार्यालय क्र.१ च्या पाठीमागील भागात शास्त्रीनगर, नेहरु नगर, गणेश देवल नगर आणि क्रांती नगर या वस्त्या असून त्यांना ३.०० मी. रुंद पायवाट आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त वस्त्या" असा करण्यात आल्या आहेत);

आणि ज्याअर्थी, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त महानगरपालिका" असा करण्यात आला आहे) उक्त अधिनियमातील कलम ३७ (१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन उक्त वस्त्याकरिता मोतीनगर येथे चर्च मागून, मौ. भाईंदर स.नं.७२२(जुना), ३४२ (नवीन) ७२३ (जुना), ३२८ (नवीन), ७६४ (जुना), ३७८ (नवीन) या जमिनीमधून १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता दर्शविण्याचा प्रस्ताव दि.१७/५/२०१४ च्या पत्रान्वये शासनाच्या मंजूरीकरीता सादर केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यकती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त फेरबदल नियोजनाच्या दृष्टीकोनातून योग्य नसल्याने नामंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आणि त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोट कलम (२) अन्वये शासनास प्रदत्त असलेल्या शक्तींचा वापर करुन शासन उक्त फेरबदल नामंजूर करीत आहे;

**०२.** सदरची अधिसूचना नागरीकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर यांचे कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध राहील.

**०३.** सदर अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,**

Ashok Kashirao Khandeker

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2018.07.07 15:47:31 +05'30'

**(अशोक का. खांडेकर)**
**कार्यासन अधिकारी**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**
**Camp Office, Nagpur.**
**Dated :- 5th July,,2018.**

**NOTIFICATION**

**No. TPS-1218/1041/C.R.73/18/UD-12,**

Maharashtra Regional and Town planning Act, 1966

Whereas, the Revised Development Plan of the city of Mira-Bhayander (hereinafter referred to as “the said Development Plan”) has been sanctioned by the Government in the Urban Development Department, under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “the said Act”) vide Notification No.TPS-1296/847/CR-162/96/UD-12, dated the 14**th** May, 1997 (hereinafter referred to as “the said Notification”) and has come into force with effect from 15th July, 1997 and the Excluded Part of the said Develpoment plan has been sanctioned by the Government in Urban Development Department vide Notification No. TPS-1298/941/CR-89/98/UD-12, dated the 25th August, 2000 which came into foce with effect from the 15thOctober, 2000;

And whereas, in Bhayander (W) behind the Ward Office No.1, the localities namely Shashtri Nagar, Nehru Nagar, Ganeshdeval Nagar and Kranti Nagar are having 3.00 mt. wide pathway as an access (hereinafter referred to as ‘the said locality’);

And whereas, Mira-Bhayander Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Municipal Corporation"), after following the legal procedure under sub-section (1) of section 37 of the said Act, has submitted a proposal for modification in the said Development Plan so as to proposed a new 18.00 mt. wide Development Plan road at Motinagar behind Chruch passing through the lands bearing S. Nos. 722(old), 342(new), 723(old), 328(new), 764(old), 378(new) of village Bhayander, for the said locality, to the Government for sanction vide letter dated 17/5/2014 (hereinafter referred to as "the said Modification");

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, Government is of opinion

that, the said Modification is not suitable in the planning point of view and hence should be rejected;

Now therefore, in exercise of the powers conferred under sub section (2) of section 37 of the said Act, the State Government hereby refuses to accord sanction to the said Modification;

**02.** This Notification shall be kept open for inspection by the general public during office hours in the office of the Commissioner, Mira-Bhayander Municipal Corporation, Bhayander on all working days for a period of one month:-

**03.** This notification shall also be published on the Government Website at www.maharashtra.gov.in

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

Ashok Kashirao Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2018.07.07 15:48:11 +05'30'

**(Ashok K. Khandekar)**
**Section Officer**